१. मा. सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १४२ अंतर्गत सी.ए.८३१/२०२३ मधील दि.३.३.२०२३ च्या निर्णयामध्ये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य या पदाची पात्रता व सदर पदावरील भरतीकरिताची पद्धती निश्चित केली असून त्यानुसार पदभरती करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत.

२. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाची अध्यक्ष व सदस्य एकूण १३२ पदे मंजूर आहेत. सदर पदापैकी २० मे, २०२३ च्या स्थितीनुसार रिक्त असलेली व फेब्रुवारी, २०२४ पर्यंत संभाव्य रिक्त पदे विचारात घेऊन एकूण ११२ पदांकरिता मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार लेखी परीक्षा २०० गुण व मुलाखत ५० गुण अशा एकूण २५० गुणांच्या गुणवत्तेवर आधारित उमेदवार निवडण्याकरिता पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

३. यामध्ये दि. २३.५.२०२३ रोजी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असल्याबाबत अग्रमानांकित वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच दि. २३.५.२०२३ ते दि. ६.६.२०२३ दरम्यान ऑनलाईन अर्ज प्राप्त करण्यात आले होते. सदर कालावधीत एकूण १५८३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

४. ग्राहक आयोग अध्यक्ष व सदस्य पदभरती करिता इन्स्टीट्यूड ऑफ बँकिंग पर्सोनेल (आयबीपीएस) यांच्या सहाय्याने दि. २५.६.२०२३ रोजी लेखी परीक्षा राज्यातील प्रमुख शहरातील आठ केंद्रावर घेण्यात आली.

५. एकूण १५८३ अर्जदारांपैकी १२११ उमेदवारांनी दोन्ही सत्रातील परीक्षा दिली. या परीक्षेतील पेपर-१ हा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा व पेपर-२ हा वर्णनात्मक स्वरूपाचा होता.

६. पेपर-१ मधील काही प्रश्न हे जाहिरातीद्वारे प्रसिद्ध अभ्यासक्रमानुसार नसल्याबाबत काही उमेदवारांकडून आक्षेप उपस्थित करण्यात आले असल्याचे आयबीपीएस यांचेकडून कळविण्यात आले होते. अशा प्रश्नांचे गुणांकनाबाबत नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार उमेदवारांचे हित लक्षात घेऊन पेपर-१ मधील १० प्रश्न वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

७. सबब पेपर-१ हा ९० गुणांचा ठरविण्यात आला. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार दोन्ही पेपर मध्ये किमान ५० टक्के गुण मुलाखतीस पात्र ठरण्यासाठी आवश्यक असल्याने पेपर-१ मध्ये ४५ गुण व पेपर-२ मध्ये ५० गुण प्राप्त करणारे उमेदवार हे मुलाखतीस पात्र ठरविण्यात आले.

८. त्यानुसार मुलाखतीस पात्र ठरत असलेल्या एकूण २३० उमेदवारांची ५० गुणांची मुलाखत मा.न्या.श्री. के.आर. श्रीराम, उच्च न्यायालय,मुंबई यांचे

अध्यक्षतेखालील निवड समितीकडून घेण्याचे ठरविण्यात आले. सदर समितीमध्ये सदस्य म्हणून श्री. विकासचंद्र रस्तोगी, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई व श्री. सुमंत भांगे, सचिव,अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचा समावेश होता.

९. संबंधित उमेदवारांची दि.१२.८.२०२३, दि. १३.८.२०२३, दि. २२.८.२०२३ व दि. २३.८.२०२३ मिनी कॉन्फरन्स हॉल, चौथा मजला, उच्च न्यायालय येथे निवड समितीने मुलाखत घेतली. मुलाखतीस एकूण २२६ उमेदवार उपस्थित होते.

१०. निवड समितीने पेपर-१, पेपर-२ व मुलाखत यांमधील प्राप्त गुणांनुसार एकूण ११२ उमेदवारांची ग्राहक आयोगातील पदांसाठी केलेली शिफारस तसेच परीक्षेस बसलेल्या सर्व १२२० उमेदवारांची प्राप्त गुणांनुसार आणि रोल क्रमांकनुसार एकत्रित यादी विभागाच्या संकेतस्थळावर माहितीस्तव प्रसिद्ध करण्यात येत आहे.

दिनांक : १५ सप्टेंबर,२०२३.

**********